म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५५३

१०२३

REFBK-0002326
REFBK-0002326

स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
नं. ५५३

बलभीम मेळ्याची

# पद्यावलि.



पद्यकार

ज्ञानबा बळवंत नवले.

१९२३

REFBK-0002326
REFBK-0002326

किंमत १॥ आणा

२३२६

# बलभीम मेळ्याची पदें.

## मंगल चरण.

चला शरण मोरेश्वराला । वंदुया तव पद कमला ॥
छळी भिष्मकाळ जगताला । साकडे लोटा विलयाला ॥
त्रैजगी प्रभ हा भरला । मर्दिले सकल असूरला ॥
भक्तांधिन । किंकरेसमान । अभंगी खूण । प्रभू पदाला धृ०
दशसुत्राच्या नायका । स्पृश्या करी भगवा पटका ॥
कबीर कमाल तैसा चोखा । उचिष्टा फलहरि चटका ॥
दशरूप तें निजधामाला । खरपरे पुंड गतकाला ॥
वाणी तुकोबाची । अखंडित साची । ज्ञानोदयाची ।
उतरी मताला ॥ १

### पद दुसरे.

चाल( मूर्तिमंत भिती )

प्रसन्न वदन कमल नयन मोद झाला मना ॥
दर्शनास विकल तुझ्या । हा संस्कार भक्ताना ॥ ध० ॥
विकट वाट दूर नेशी, भारतभूहि वसो सुखासी ।
स्वरूपताहि आस त्यांची, दे वर दान करि करूणा ॥ १ ॥

काव्य ६६६

## पद तिसरें.

चाल( राधा धर )

अहानषों भज प्रभूला । मनुज्या । येणें मिळविशीं चीर सौख्याला ॥
सकळांचा हरि सत्कैवारी । भजेरे मनुज्या अदरे मोदा ॥
मनु हृदयांतरी शड्रिपू आगर । नामें जपता होई कंदन ॥

## पद चौथे.

चाल( राभ पाहिला )

संघ करू या चला जाऊ मोरया ॥ धृ० ॥
शरण चरण होऊं लिन प्रेमे व्हावू दुर्वासूमन ॥
सकल स्थानीं हें प्रधान । हरि संकट भया ॥ १ ॥
असूरासभ काम क्रोध । मोह भवाद्धीचा छंद ॥
नच सोडी अनूबंध । भीष्म माया ॥ २ ॥

## पद पचावें.

चाल( अंकित )

प्रभू पदि सदा हे मनरथ होई । सवर्था । हृदयी राही ॥ धृ०
राष्ट्र आलय हा तुझाची सारा । स्वदेश उन्नती होई ॥ १ ॥
धैर्य तयाचें बहू बलवंत इशा यशोहार देई ॥ २ ॥

## पद साहावें.

चाल( भक्तजन )

जय श्री जयवदा । कृपावंत माय आपुली ॥ धृ० ॥
स्वबला तें वधुनि असुर । राक्षिले जना ॥ १ ॥
स्वपदीं ही आस जननी । द्वैतभाव टाळ झनी ॥
सहस्र रव ऐक्य भाव । ही आस श्री सुता ॥ २ ॥

## पद सातवें.

चाल( नयनी दिसे )

नहि छोड़ू छोडू चरका । जलमय बनावू खादी ॥ धृ० ॥
करो संघ बालगोपाला, दुजा सागर रहे दूर ॥।
दर्शनकू प्यास खादी, तनमन लगाये गांधी ॥ १ ॥
भक्तांको नयना उतरीं,। दर्शनकू पार निकले ॥
सबिस्थान दान खादी । तनमन लगाये गांधी ॥ २ ॥

ग्रंथसंग्रहालय
नं. ......
ता. ......
ठाणे.

## पद आठवें.

चाल( राधाकिसन )

यशोहारी हा चरका हमारा सब भाइके घरमे पसारा ॥धृ०

दीनि धरमका हिंदी है तारा ।
सब भाइकों कानो उतारा ।
एकि दर्शन खादी जग पाया ओइ स्वराज्य हमने कमाया ॥१॥
सुनो सुनो भाई आपनेकु ।
हय शरमकी बात ।
खादी पसार करणा ।
एहि गांधीकी बात ॥
लोकमान्यका स्वर्गी हय कहेना सब भाईनें गांधो ही जना ॥२॥
जाहा देखो वै गांधी हामारा सौख्य सोपानका सागर किनारा
जीस बखत असूराको नाश करके :
देव तारे ।
वैसाहि परचीजका त्याग करणेसे ।
भारत माय तारे ॥
आपणे भाइकों इतना इशारा सब दुनयेमे खादी पसारा ॥ ३ ॥

## दद नवर्वे

चाल ( गोंधळी. पोवाडा

बहु मोलाचा चहा सरदारी ।
किर्ती त्याची ऐका ।

२३२६

गिळिले हिंदुस्थान त्यानें ।
अघोर हा धोका ॥ ध्रृ० ॥
जिकडे तिकडे दुकान चहाचे ।
भजी बटाट्याची ।
पातळ भाजी वडें पापडे ।
चटनी मसल्याची ॥ १ ॥
उंची पक्कानें दूर पळालो ।
सुधा मिसळिची ।
शंकरपाळी चटक लागली ।
रोटी बटराची ॥ २ ॥
हॉटेलामध्यें गर्दी झडती ।
नित्य नविनाची ।
ज्ञाति बांधव वर्णन करितो ।
किर्ती ऐका त्याची ॥ ३ ॥
न्हावी तेळी परीट साळी ।
जिनगर नानाजी । तांबट ।
शूद्र ब्राह्मण माळी कोळी ।
पंगत सकलांची. । संकर ॥ ४ ॥
ब्राम्हणाचे दुकान साचे ।

खूण जानव्याची ।
अंतर गृहामध्यें शुद्रीन बाई ।
गर्दी फराळाची । उठवी ॥ ५ ॥
हॉटेलामध्यें शुद्र जोडी ।
खंड्या पांड्याची ।
कोणी उघडा घामट बंडी ।
सेंट पळ काडी ॥ ६ ॥
उष्टे एकाचे दुकट्या देता ।
तोंडा बोट घाली ।
त्या बोटाचा स्पर्श चहाला ।
थुंकी गट्ट गिळती ॥ ७ ॥
दुष्परीनामी चहा हरामी ।
पुढील चरणी ऐका ।
चक्काचूर करी वस्तु नाना ।
नवनवीना धोका ॥ ८
प्रथम चहाची चठक लागता ।
जिव्हां चरचरली ।
मशा सवेनें त्यानें केली ।
काळजांत खोली ॥ ९ ॥

अहार्नेशी तो क्षुधे आधी चहा ।
त्रिकाळी घेई ।
कार्यारंभी इष्टमंडळा ।
चहाचा कप देई ।
चहा वर्णानें जितका काळा ।
मनु करी भोळा ।
रजा गजाचा काळ पुरुष तो ।
सकलांना धोका ॥ ११ ॥
चहा प्याल्यानें मज्जातंतू ।
असक्त होतात ।
विष द्रव्याची फुट तयाला ।
गुंगीची खान ॥ १२ ॥
नयन थिजले मुखहि नुरले ।
क्षीण तनु त्याची ॥
निपजली जरी पोरे तयाची ।
प्रेतासम साची ॥ १३ ॥
अशा स्थितिची प्रजा निपजता ।
हिंदूस्थानांत ।
जगावें का मरावें अंती ।
सरडाची मात ॥ १४ ॥

ग्रंथ संग्रहालय
क्रमांक

चहादुकानीं घान सडके ।
कॉलराची वस्ती ।
अरोग्य मंडळ नयना पुढती ।
उंद्रझुराळांच्या कृति ॥ १५ ॥
काळ कसाई चहा शिपाई ।
बंड त्याचे मोडा ।
दंड ठोकुनि तनु गडावर ।
धेनुरस सोडा ॥ १६ ॥
चटकदार मासाला जगाचा ।
श्रवण करा भाई ।
महारा करिचे गोमय चुलीला ।
पृश्स्य कुठें राई ॥ १७ ॥
चहा सेवनें भ्रष्ट कार ।
स्पृश्य अपृश्य करी ।
सर्व बाटके कोणी न उरला ।
समाच सागरी सकला ॥ १८ ॥

### पद दहावें

चाल ( पुण्यवंत महाराज )

धन्य धन्य महाराज छत्रपती । धन्य धन्य शिवराज ।

प्रसन्न तुम्हाला कुल स्वामिनी लक्ष्मीचा आधार ॥ ध्रृ० ॥

भारत भूवर म्लेंच्छ मातले । तयासाठीं अवतार ।

प्रखर भवानि करी घेऊनि । शत्रू केळें बेजार ॥ १ ॥

चाल-दादोजी कोंडदेव मंत्री । गागाभट तंत्री । मराठे क्षत्री ।

महाराज शिवराजाचे । महाराज शिवरायानें आपुल्या पराक्रमानें ।

तोडीले बंधन शहाचे । धडाडी मोठा मर्द मावळा ।

अनुकूल शिवबाला । ऐक्य मतानें रायगडावर झेंडा फडकविला

चाल-शिंदे शिर्के घोरपडे आले । रणगाजी चव्हाण पाहिले ।

निंबाळकर मोहिते जमले । सरदार अंबारी सजले ॥

राव येसाजी आणि तान्हाजी मोठे मोठें सरदार ।

आपल्या सेवेसी तत्पर असती सकल मावळे स्वार ॥ ३ ॥

चाल-शिवबा लहानपणी अभंड । संगती लोकांच्या अडदांड ।

धडाडी करूनि युद्ध कांड । चोहोंकडे यशाचे तोंड ।

बहु युक्तीनें शत्रू जिंकीलें पुत जिजावूचा ।

बावण किल्ले भगवा झेंडा फडके मराठ्याचा ॥ ४ ॥

चाल-आनंद झाला सकलाला । जिजाऊ शाहू नृपाला ।

पुन्हा कृष्ण जन्माला आला । त्याची धास्ती होती कंसाला ।

तैसा त्या मोंगलाला शिवबाचा दरारा बसला ।

गोब्राम्हण प्रतिपाल रक्षिलें । जनते महा आधार ।

भप ऐसा होणें नलगे शंकराचा अवतार ॥ ६ ॥

## मद्द अक्षरांचें

चाल ( गोंधळी )

कवि काव्यांची नाटय मालिका । गद्य पद्यांचा पुष्प हार ।
नवपणाचें दर्पण पाहुनि कितीक नटती नारीनर ।
खाडीलकरचा मानापमान । जोड शारदा देवलची ।
श्रीमंताची खोड मोडली । हाच मुलाच्या बापाची ॥ १ ॥
राक्षसी महत्वकांक्षा मोठी संसारा संन्यासाची ।
संशय कल्लोल विनोद पहावा । साक्ष असोद्या हॅम्लेटची ॥ २ ॥
प्रेम संन्यासाचा मनोविजय तो । विचित्र लीला परोपरी ।
पुण्य प्रभावाचा एकच प्याला । भाव बंधन धेई करीं ॥ ३ ॥
तारि सुदर्शन जुगारी जगाला । लोक शासनी नच मानी ।
खरा मायेचा पूत तयाची । नजर तारा मंडळावरी ॥ ४ ॥
देश सेवक गांधीं टोपी । चलता दुनिया ही लिहीती ।
पुरे होईना स्वत्व साफल्य तुरुंगाच्या द्वारा जाती ॥ ५ ॥
अंकर वर्णे नाट्य रचना कितीक होती नच गणती ॥
माईसाहेबाचे स्त्रीसाम्राज्य । बट्याबोळ मध्यें करी फजिती ॥ ६
दुरंगी दुनिया तारकमारक । पंकांकी दंडधारी ।
सौख्यसोपानी स्वराज्य सेवा । सत्य विजया बरोबरी ॥ ७ ॥

## पद बारावें

### चाल( गचल )

खवळला देश हा आपुला । करारे शांत हो त्याला ॥ ध्रु० ॥
जमविण्या लोक शाहीला । खेचा अती धैर्याला ॥
मिळवा स्वातंत्र्य माला । राष्ट्री होइ बोल बाला ॥ १ ॥
भाईनो उठा उठाहो चला । गाडा शठम शाठचाला ॥
बळकटी राष्ट्री निशाला । तेवी स्वराज्य स्तंभाला ॥ २
समयीं सोडा आळसाला । दारुण प्रसंग तुम्हाला ॥
राखा स्वाभी मानाला । गर्जूनी स्यराज्य जय बोला ॥
दु:ख ते भारत मातेला । अंति होइ सकलांना ॥
जगी सौख्य काय बोला । इतके आळशी का बनला ॥ ४ ॥
धारवाड नागपूरा लाही । होळी पंजाबाची होई ॥
मोपला बंड हात घाई । अंति सकल फल मोला ॥ ५ ॥
वज्र घाताचा भाडिभार । बेदम केला गुरुकाद्वार ॥
मुळशी पेठा सर होणार । ऐक्य साधनांती ॥ ६ ॥
युद्धा काळा कितीक बळी । सकल राष्ट्रही दुबळी ॥
हिंदु मुसलामाना तंटा । समयीं कांहीं भागाला ॥ ७ ॥
लढो लढोजी मेरे भाई । देखुंगा हमतो पिछे कोई ॥
मरणा मेरेतो मरजान । खाऊंगा हमे तिजा तोहि ॥ ८ ॥
मागगे त्याचे तुम्हाला । पुरविता होत शांतेला ॥

गुंफा ऐक्य मालेला । झटिति । घ्या यश कार्याला ॥ ९ ॥

पद तेरावें

चाल( अरे या शिकुनी )

किती छान मजेदार या नवनिवणांच्या मौजा ॥ धृ० ॥
करिं पैसा चंचल । राही डोळ्यांत भळ ।
मन करि जळफळ । किती रेसेसी मारितो पैजा ॥ १ ॥
विदेशी बूटसुट कोट । घेति मद्याचा घोट ।
येता पैजेसी खोट । काढी हजारी नोट ।
एका मिनिटांत जाई त्या पैजा ॥
बुडता पैशाची खान । लागे काळाचे ग्रहण ।
किती धुळीस जाती त्या पैजा ॥ ३ ॥
जोडी रुयाची ी । अंति पांचाची घाई ।
काढी तिकीट सवाई । मम श्वानाकडे पाही ।
घोडा गेला करि मग हायहाय ॥ ॥ ४ ॥
झोडी प्राणाची नाड । कैची मुहूर्त घबाड ।
लोकी तळी विहीरी आड । न लागे तया यम फौजा ॥
धुम्रपान पान प्रतिकार । तशी अट्टल जुगार ।
तेणे गणिका प्रकार । करि कर्दपांचा वार ।
सज्ज करा पिंकिटींग फौजा ॥ ४ ॥

# बलभीम मेळा.

REFBK-0002326
REFBK-0002326

हें पुस्तक गोपाळ चिंतामण अनगळ यांनीं पुणें पेठ
बुधवार घ. नं. ५२४ येथें चतुःशृंगीं छा० छा०

२३२६